UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९१ • मार्च २०२३ • पुरवणी अंक ३



Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj Dist.Kolhapur

स्थापना : १ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

७२. आधुनिक भारताचे अर्थनीतीकार राजर्षी शाहू महाराज

– डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे ---------- २९५

७३. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा संरक्षणाचे कायदे

– डॉ.संभाजी सोपानराव दराडे ---------- ३००

७४. वेदोक्तो प्रकरणात राजर्षी शाहू महाराज यांची भूमिका

– प्रा.ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर ---------- ३०४

७५. छत्रपती शाहू महाराज यांचे शेतकऱ्यांच्या समस्या आणि शेती सुधारणेबाबत विचार

– श्री.विष्णू मनोहर गावडे ---------- ३०७

७६. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

– प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील ---------- ३१०

७७. कोल्हापूर मल्लविद्येचे माहेरघर व छ. शाहू महाराज

– प्रा. डॉ. थोरे किशोर धोंडीबा ---------- ३१७

७८. राजर्षी शाहू महाराजः अब्राम्हणी राजा

- अप्पासाहेब मल्लप्पा देशमुख ---------- ३२२

७९. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जडणघडणीतील ब्रिटिशांचे विशेषतः गुरु फ्रेजर यांचे योगदान

- डॉ. शिल्पा शेटे ---------- ३२७

८०. राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य

- डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे ---------- ३३२

८१. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य

– प्रा.डॉ.जयकुमार चंदनशिवे ---------- ३३६

८२. राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षणातील योगदान

– श्रीम. स्वामी आगतराव घावटे ---------- ३३९

८३. राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यद्धाराचे कार्य : विशेष संदर्भ – राजर्षी शाहू वसा आणि वारसा ; एक आकलन

– डॉ. शारदा कदम ---------- ३४२


ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, GADHINGLAJ
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.

औद्योगिक विकास हे महाराजांचे उद्दिष्ट होते. खाजगी उद्योगाबरोबरच सार्वजनिक क्षेत्रात शाहू महाराजांनी विविध उद्योगांची निर्मिती केली व त्या आधारे आपल्या संस्थानांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास आणि विस्तार करण्याचा प्रयत्न केला. उद्योगांचा विकास आपल्या संस्थांमध्ये करण्यासाठी आर्थिक सर्वेक्षण करून घेतले. या सर्वेक्षणाच्या आधारे मोठ्या कल्पकतेने अनेक उद्योगांची उभारणी केली व त्याला प्रोत्साहनही दिले. यामध्ये औषधी तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, कोलार्क उद्योग आणि सुती कापड उद्योगांचा समावेश होतो. उद्योगांचा विकास हा प्रशिक्षित व कौशल्यावर आधारित कामगारावर अवलंबून असतो. म्हणून आपल्या संस्थानातील अनेक लोकांना उद्योगाचे प्रशिक्षण घेण्यासाठी बाहेर पाठवले. तसेच बाहेरील प्रशिक्षित लोकांना आपल्या संस्थानात अधिकारीपदी नेमले. त्या पाठीमागे उद्देश हा होता की, तज्ञ लोकांच्या हाताखाली आपली माणसे तयार होतील अशी धडपड महाराजांची होती. उद्योगधंद्याच्या क्षेत्रात मोठा प्रकल्प हाती घेतला तो म्हणजे कापड गिरणीचा. शाहू महाराजांच्या प्रेरणेने १९०६ मध्ये दि शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वि विंव्हीग मिल्स या गिरणीची स्थापना झाली. या गिरणीच्या उभारणीसाठी विस्तीर्ण जागा, पाण्याची तळे आणि ५०,००० रुपयांचे भांडवल महाराजांनी उपलब्ध करून दिले. या उद्योगामुळे कोल्हापुरातील शेकडो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. इतकेच नव्हे तर कोल्हापूर हे हिंदुस्थानाच्या कापड उद्योगाच्या नकाशावर ठळकपणे दिसू लागले. याशिवाय शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज इत्यादी ठिकाणी अनेक जिनिंग फॅक्टरी स्थापन झाल्या होत्या. सन १९१२-१३ च्या सुमारास संस्थानातील पहिली ऑइल ऑइल मिल, पहिली सॉ मिल, पहिली फाउंड्री फॅक्टरी, पहिली इलेक्ट्रॉनिक कंपनी असे अनेक उद्योग सुरू झाले. निरनिराळ्या उद्योगांसाठी प्रशिक्षित कामगार तयार व्हावेत म्हणून महाराजांनी राजाराम इंडस्ट्रियल स्कूलची स्थापन केली. संस्थानातील लहान, मोठ्या व्यापाऱ्यांना, उद्योजकांना प्रसंगी अल्पमुदतीची कर्जे सरकारकडून देण्याची व्यवस्था करण्यात आली. संस्थानाबाहेरच्याही उद्योजकांना महाराजांनी त्यांच्या व्यापारासाठी, व्यवसायाच्या वाढीसाठी मदत केलेली अनेक उदाहरणे दिसून येतात.

**राजर्षी शाहु महाराजांचे व्यापार विषयक विचार :**

जगातील कोणत्याही विकसित देशाचा अभ्यास केल्यास त्या देशाच्या आर्थिक विकासामध्ये शेतीबरोबरच उद्योग आणि व्यापाऱ्याची भूमिका ही महत्त्वाची राहिली आहे. उद्योग आणि व्यापाराशिवाय समाजाचा आणि संस्थानाचा विकासाला मर्यादा येऊ शकतात याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना होती. विशेषतः व्यापार आणि उद्योगात आपण मागे पडल्याने भयानक अशा आर्थिक शोषणात आणि पारतंत्र्यामध्ये आपण अडकत गेलो याची जाणीव शाहू महाराजांना होती. सन १९१७ मध्ये खामगाव येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनात अध्यक्ष म्हणून संबोधित करताना त्यांनी आपल्या मनातील भावना व्यक्त केली. आपल्या संस्थानातील लोकांनी फक्त शेतकरी आणि सैनिकच म्हणून राहू नये. तर व्यापारी, व्यवसायिक, उद्योगधंदे आणि इतर उच्च प्रतीचे व्यवसाय केले पाहिजे अशी भावना महाराजांची होती. शाहू महाराजांच्या कारकर्दीच्या सुरुवातीच्या काळात कोल्हापूर संस्थानांमध्ये व्यापाराची स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये उद्योग आणि व्यापार वाढावा यासाठी विशेष प्रयत्न केले. शाहुपुरी ही बाजारपेठ स्थापन केली. कोल्हापूर, कागल, निपाणी येथील व्यापारी वर्गांना विशेष अशा सवलती देऊन त्यांना वखारी उघडण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानांमध्ये व्यापारी वर्गांची संख्या वाढली. परिणामी आर्थिक व्यवहार वाढले. शेतमालाला चांगला भाव मिळू लागला. शेतमालाला संस्थांमध्ये संस्थांमध्येच बाजारपेठ उपलब्ध झाली. या बाजारपेठेमध्ये लाखो रुपयाची उलाढाल होऊ लागली. आज कोल्हापूरचे गुळ हे सर्वत्र प्रसिद्धीस आले याचे मूळ सुद्धा शाहू महाराजांच्या व्यापारातील दृष्टिकोनामध्ये दिसून येतो. शाहू महाराजांनी शाहुपुरी बरोबरच शिरोळ रेल्वे स्टेशन जवळ १९१७ साली जयसिंगपूर या ठिकाणी नव्या बाजारपेठेची निर्मिती केली. कोल्हापूर संस्थानातील पश्चिमेकडील लोकांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी. यासाठी या बाजारपेठेची निर्मिती केली. एकूणच शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये विविध ठिकाणी बाजारपेठांची निर्मिती करून शेतकरी, व्यापारी आणि व्यवसायिक या सर्वांचा सर्वसमावेशक विकास घडवून आणण्याचा अधिक प्रयत्न केलेला दिसून येतो.

**राजर्षी शाहु महाराजांचे सेवा क्षेत्रविषयक विचार :**

सेवा क्षेत्रात मुख्यतः शिक्षण आणि आरोग्य विभागांचा समावेश होतो. शिक्षणाचं महत्त्व महाराजांना नैसर्गिक समजलं होतं. कोल्हापूर, नाशिक, पुणे, नागपूर, पंढरपूर, कराड अशा ठिकाणी महाराजांनी शैक्षणिक प्रकल्पांना, वसतिगृहांना मदत केली.

कोल्हापूर इथं जैन, लिंगायत, मुस्लिम, ब्राह्मण, मराठा या समाजांची स्वतंत्र वसतिगृहं सुरू करण्यासाठी जागा दिल्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचं, मोफत करण्यात आलं. दुय्यम शाळांना प्रोत्साहन देण्यात आलं. राजाराम कॉलेज सुरू करण्यात आलं.



ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj Dist.Kolhapur

मागास प्रदेशात शिक्षण विस्तार, वसतिगृहांची स्थापना, शैक्षणिक, प्रशासन सुधारणा ही महाराजांच्या शिक्षण धोरणाची मुख्य सूत्रं होती. प्राथमिक शिक्षण सक्तीचं करणारा कायदा १९१७ मधे झाला. हा क्रांतिकारक निर्णय होता. शिक्षण खर्चाची तरतूद करण्यासाठी क्षमतेवर आधारित शैक्षणिक अधिभार बसवण्यात आला.

शाहू महाराजांनी १८८७ला 'जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट', १९२४ला 'राजाराम इंडस्ट्रीयल स्कूल', १९१२ला 'किंग एडवर्ड शेती, शिक्षण संस्था', 'प्रशिक्षण, शिक्षण प्रशिक्षण, सत्यशोधक, पुरोहित शाळा', 'युवराज शाळा', 'सैनिकी शाळा' अशा विशेष शिक्षण संस्थाही सुरू केल्या. त्याचबरोबर 'देवल क्लब', 'तलाठी प्रशिक्षण संस्था', 'संस्कृत शाळा', 'उर्दू शाळा', 'रात्र शाळा' सुरू करण्यात आल्या. सर्वात विशेष म्हणजे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी १९११मधे शुल्कमाफी जाहीर करण्यात आली.

१९१३ला मागासवर्गीयांसाठी प्रत्येक खेड्यात शाळा असाही निर्णय घेण्यात आला. राजर्षींनी मुलींच्या शिक्षणसाठीही पुढाकार घेतल्याचं दिसतं. गुणवत्ता शिष्यवृत्त्या आणि शैक्षणिक मदत देण्याची व्यवस्थाही महाराजांनी केली. त्यासाठी १६ शैक्षणिक सक्षमता निधी उभारले होते. ग्रंथालयांना निधी दिले जात.

**राजर्षी शाहू महाराजांचे आरोग्य क्षेत्र विषयक विचार :**

शाहू महाराजांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे पूर्णतः लक्ष दिल्याचं दिसतं. प्लेगच्या काळात विलगीकरणाची व्यवस्था केली गेली. १९१९च्या एन्फ्ल्यूएन्झा साथीत महाराजांनी कसोशीने सार्वजनिक आरोग्य व्यवस्था राबवली. महाराजांच्या काळापूर्वीच 'अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल' सुरू करण्यात आलं. सध्या हेच हॉस्पिटल 'छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल' म्हणून ओळखलं जातं.

खरं तर राजर्षी शाहू महाराजांची राज्यव्यवस्था सामान्यांच्या हितासाठी; दुर्बलांच्या मदतीसाठी; सर्वांना समान न्याय देण्यासाठी; शेती, उद्योग, व्यापार यांच्या विकासासाठी कार्यरत होती. राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय यांचं संतुलन साधण्याचा, तेव्हाच्या परिस्थितीत युगप्रवर्तक प्रयोग केला, हे मान्यच करावं लागेल.

**छत्रपती शाहू महाराज कल्याणकारी राजा :**

कल्याणकारी राज्याच्या विचार करून रूढ झालेल्या काळात व्यापक समावेशक राज्यव्यवस्थेची उभारणी करणाऱ्या जगातल्या काही मोजक्या राज्यांच्या मध्ये शाहू महाराजांचा समावेश होतो. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य या क्षेत्रातील त्यांचे उपक्रम काळाच्या कितीतरी पुढे होते. त्यांची राज्यव्यवस्था सामान्य व दुर्बळांची हित जपणारी आणि विकासाभिमुख होती. शाहू महाराजांनी समाजातल्या दुर्बळ घटकांचा विचार करून सर्व धर्म, जाती, जमाती यांना एकत्रित करून सामाजिक विषमतेला विरोध केला. आपल्या राज्यातील लोकांचे जीवन अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, रोजगार, शिक्षण आणि संरक्षण व्यवस्थित देण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. कल्याणकारी अर्थशास्त्र आणि कल्याणकारी समाज रचना निर्माण करणारा युगपुरुष म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय.

**समारोप :**

राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी कृषी, उद्योग, सेवा, व्यापार सहकार आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रात भरीव असे कार्य केले. कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या शाहू महाराजांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल. महाराजांनी आपल्या सत्तेचा वापर समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी केला. सर्व जाती धर्मीयांना एकत्रित घेऊन सामाजिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला.

कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेतकऱ्यांपर्यंत सुधारित बी बियाणे, खते, अवजारे, पशुपालन यांची माहिती पोहोचवली. शेतकऱ्यांसाठी आधुनिक अवजारांचे प्रदर्शन भरवले, वृक्ष लागवड करण्यासाठी प्रोत्साहन दिले. कर्ज पुरवठा करणाऱ्या विविध योजना हाती घेतल्या व लाखो रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. शेतकऱ्यांना सावकारांच्या विळख्यातून सोडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. शेतीचे होणारी विभाजन आणि तुकडीकरण याला विरोध दर्शविला. शेती सिंचनाखाली आणण्यासाठी नवीन विहिरी, तलाव, बंधारे, कालवे बांधण्यास सुरुवात केली. राधानगरी धरणासारखा प्रकल्प हाती घेतला. महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण्यासाठी महाराजांनी विशेष असे प्रयत्न केले.

आपल्या संस्थांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास करण्यासाठी आर्थिक सर्वेक्षण करून घेतले. औषधी तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, सुती कापडं उद्योगांचा विकासाबरोबरच कामगारांना कौशल्य आधारित प्रशिक्षण उपलब्ध करून देऊन हजारो लोकांच्या हाताला काम मिळवून दिले. शेती, उद्योग यांच्या विकासाबरोबरच व्यापाराचाही विकास घडवून आणण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केला. कोल्हापूर, कागल, निपाणी येथील व्यापारी वर्गाना विशेष सवलती देऊ केल्या. शाहूपुरी

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Regd. No. 2/12883 Estd. June - 1998 Tal. Gadhinglaj, Dist. Kolhapur

ISSN No. 2394-5990

जयसिंगपूर या ठिकाणी बाजारपेठेची निर्मिती करून शेतकरी, व्यापारी, व्यवसायिक या सर्वांचा सर्व समावेशक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

शाहू महाराजांनी शिक्षण आणि आरोग्य विभागाचा विकास घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचं आणि मोफत केले. दुय्यम शाळांना प्रोत्साहन दिले. राजाराम कॉलेज सुरू केले. याबरोबरच विविध प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची उभारणी केली. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारले. आरोग्याच्या सुविधा विकसित करण्यासाठी हॉस्पिटलची निर्मिती केली. आपल्या राज्यातील लोकांचे जीवन सुखकर होण्यासाठी कल्याणकारी समाज रचना निर्माण करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केलेले दिसून येते.

**संदर्भ :**


१. डॉ. जयसिंगराव पवार (२००७) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

२. प्रा. नाना साळुंखे (२००६) शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर

३. तू. बा. नाईक (२००६) छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४. डॉ. जयसिंगराव पवार (२००४) राजर्षी शाहू छत्रपती: एक मागोवा, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली.

५. डॉ. टी. एस. पाटील (२०१२), राजर्षी शाहू छत्रपती, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

६. राजर्षी एक व्यक्तिदर्शन प्रा. श्याम येडेकर, कोल्हापूर

७. शाहू छत्रपती आणि लोकमान्य डॉ. य. दि. फडके, पुणे, १९८२

८. राजर्षी शाहू छत्रपती वाद आणि वास्तव डॉ. रमेश जाधव, कोल्हापूर,१९९२

९. क्रांतिसूक्ते राजर्षी छत्रपती शाहू संपा. डॉ. एस. एस. भोसले, कोल्हापूर, १९७५

१०. कोल्हापूर गॅझेटियर महाराष्ट्र राज्य गॅझेटियर कोल्हापूर जिल्हा संपा. कि.का. चौधरी, मुंबई, ११

११. प्रबोधन प्रकाशन ज्योतीचे विविध अंक

१२. विविध वर्तमान पत्रातील विविध लेख.

१३. इंटरनेट वरील विविध वेबसाईट वरील माहिती


■■■

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.

I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.